महाराष्ट्र शासन
**सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद**
पीरबाजार, उस्मानपुरा, पत्रपेटी क्र.५१६, औरंगाबाद – ४३१ ००५
दुरध्वनी क्र.: ०२४०-२३३४२१६/२३३४७६९
ईमेलः roaurangabad@dtemaharashtra.gov.in, website: www.dteau.org

जा.क्र.: विकाऔ/आस्था-३/२०२०/ 1301 दिनांक : 10 AUG 2020

**कार्यालयीन आदेश :**

संदर्भ :- १. उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग शासन निर्णय क्र. जीईसी/३३९७/७३७६/ताशिं-१, दि. १०-०४-१९९७.
२. महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडतांना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५.
३. उच्च व तंत्रशिक्षण विभाग शा.नि.क्र.संकिर्ण-२०१५/(०१/१५) मशि-१, दि.२५-५-२०१५.
४. सामान्य प्रशासन विभाग शा.नि.क्र. एसआरव्ही-२०१७/प्र.क्र.४१५/कार्यासन १२ दि.०९-०४-२०१८.
५. सामान्य प्रशासन विभाग शा.नि.क्र. एसआरव्ही-२०२०/प्र.क्र.३०/कार्या १२ दि.०७-०७-२०२०.
६. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्र. १२/आस्था/बदल्या/२०२०/१७७, दि. १०/०७/२०२०.

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील (सन २००६ महा. २१) च्या कलम ७ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन, दिनांक २८-५-२०१५ च्या अधिसुचनेद्वारे उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील गट-ड साठी बदली करणारे सक्षम प्राधिकरण म्हणून विभागीय सहसंचालकांना पदनिर्देशित करण्यात आलेले आहे.

त्यास अनुसरुन सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद यांना उपरोक्त संदर्भिय शासन निर्णयान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन या कार्यालयाच्या अधिनस्त संस्था/कार्यालयातील गट-ड संवर्गातील खालील कर्मचाऱ्यांच्या त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी विनंती/प्रशासकीय कारणास्तव विभागांतर्गत बदल्या करण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कर्मचा-यांचे नाव, पदनाम व सद्याचे कार्यरत ठिकाण | बदली/पदस्थापनेनंतरचे ठिकाण | बदलीचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | **हमाल** | | |
| १ | श्री. बी. एस. वडकिले<br>शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन, लातूर | शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद येथील रिक्त पदावर | विनंती बदली |

सदर बदल्यांची अमलबजावणी प्रभावीपणे होणे गरजेचे असल्यामुळे बदली झालेल्या सर्व कर्मचाऱ्यांचे कार्यमुक्ततेच्या दिनांकापर्यंतचे अथवा जास्तीत जास्त दि. ३१-०८-२०२० पर्यंतचे वेतन ते सध्या कार्यरत असलेल्या संस्थेच्या आस्थापनेवर काढावे. त्यांनतरचे वेतन कोणत्याही परिस्थितीत बदलीपुर्वीच्या संस्थकेडून/आस्थापनेकडून काढण्यात येऊ नये. सदर वेतन संबधित कर्मचारी बदलीच्या संस्थेत रुजू झाल्यानंतर बदलीनतरंच्या संस्थेने/आस्थापनेने काढावे. दि. ०१-०९-२०२० पासूनचे वेतन बदलीपुर्वी कार्यरत असलेल्या संस्थेतील/आस्थापनेतील आहरण व संवितरण अधिकाऱ्याने अदा केल्यास त्यांना व्यक्तीशः जबाबदार धरण्यात येईल.

उपरोक्त कर्मचाऱ्यांनी बदली करण्यात आलेल्या संस्थेत/कार्यालयात तात्काळ रुजू व्हावे. ज्या कर्मचाऱ्यांची बदली त्यांच्या विनंतीवरुन करण्यात आलेली आहे किंवा ज्यांचे मुख्यालयात बदल होत नाहीत. अशा कर्मचाऱ्यांना बदलीच्या ठिकाणी हजर होण्यासाठी प्रवासखर्च व पदग्रहण अवधी अनुज्ञेय राहणार नाही.

**(महेश शिवणकर)**
**प्र.सहसंचालक,**
**तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद**

**प्रत, माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित**

१. मा. संचालक तंत्रशिक्षण संचालनालय म. रा. मुंबई-१ यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. कोषागार अधिकारी जिल्हा कोषागार कार्यालय, औरंगाबाद/लातूर (माहितीर्थ)
३. प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविदयालय, औरंगाबाद
४. प्राचार्य, पु. ला. शासकीय तंत्रनिकेतन, लातूर/ शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन, लातूर
५. संबधित संस्थाप्रमुखांना कळविण्यात येते की, बदली झालेल्या कर्मचा-यांना त्यांच्याकडे असलेला कार्यभार हस्तांतरीत करण्याबाबतची कार्यवाही करुन तात्काळ कार्यमुक्त करण्यात यावे व बदली झालेल्या संस्थेत कर्मचा-यांना बदलीच्या ठिकाणी रुजू करुन घेण्यात यावे.
६. संबधित कर्मचारी (संस्था/कार्यालय प्रमुखामार्फत)